# Possitive Stories

गडचिरोली दि. ०५/०६/२०१७

**कोटपा (COTPA २००३) कायद्याची अंमलबजावणी करून गडचिरोली जिल्हा तंबाखू मुक्त करणार**
**- जिल्हा पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख**

३१ मे जागतिक तंबाखु नकार दिन निमित्य, पोलीस मुख्यालय व राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम सा. रुग्णालय गडचिरोलीच्या संयुक्त विद्यमाने पोलीस मुख्यालयात कोटपा (COTPA सिगारेट व अन्य तंबाखूजन्य पदार्थ नियंत्रण कायदा २००३) कायदा विषयी प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आली.

या कार्यशाळेला डॉ. कैलास नगराळे, जिल्हा सल्लागार, राष्टीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम सा. रुग्णालय गडचिरोली यांनी कोटपा कायदयाबद्दल जिल्हयातील सर्व पोलीस अधिकऱ्यांना व्हिडीओ कॉन्फरन्सिग व्दारे सविस्तर माहिती दिली.

**कोटपा कायदा काय आहे -**

१) कोटपा कलम ४- सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान करणे गुन्हा आहे.

२) कोटपा कलम ५- प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष तंबाखूयुक्त पदार्थाची जाहिरात करणे गुन्हा आहे.

३) कोटपा कलम ६(अ) - १८ वर्षाखालील (अल्पवयीन) व्यक्तीला तंबाखूयुक्त पदार्थाची विक्री करणे किंवा करवुन घेणे गुन्हा आहे.

४) कोटपा कलम ६ (ब) - शैक्षणिक संस्था व १०० यार्ड परीसरात तंबाखूयुक्त पदार्थाची सेवन व विक्री करणे गुन्हा आहे.

५) कोटपा कलम ७ - तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाच्या वेस्टनवर धोक्याची सुचना देणे बंधनकारक आहे.

या कायद्याचे उल्लंघन केल्यास कायद्याने दंड आणि सजा आहे. जिल्हा पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख यांनी गडचिरोली जिल्हयात प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी भरारी पथक स्थापन करून कोटपा कायद्याची १००% अंमलबजावणी करून जिल्हयाला तंबाखूमुक्त करण्याचे आश्वासन दिले. प्रशिक्षण कार्यशाळेच्या आयोजनासाठी पोलीस उपअधिक्षक (गृह) श्री. गणेश बिरादार, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. प्रमोद खंडाते, पोलीस निरीक्षक स्थागुशा श्री. यशवंत नलावडे, पाउपनि सुनिल इंगळे, पोउपनि समु चौधरी, पोशि/ श्रीनिवास संगोजी, विश्वनाथ उडाण आणि सायकालॉजीस्ट दिनेश खोरगडे यांनी सहकार्य केले.

